शुक्रवार दि.२४ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २६६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    www. lokneta.com

## उद्धव ठाकरेंच्या अडचणीत वाढ

# ‘त्या’ पत्रकार परिषदेची केंद्रीय निवडणूक आयोगा कडून दखल, भाजपच्या तक्रारीनंतर चौकशीचे आदेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईत सोमवारी मतदानाच्या दिवशी पत्रकार परिषद घेतल्याने ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण केंद्रीय निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्या या पत्रकार परिषदेची चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. भाजप नेते आशिष शेलार यांनी यासंदर्भात तक्रार केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतय निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे यांच्याविरोधात भाजपने केलेल्या तक्रारीची दखल घेतली आहे. निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरेंनी सोमवारी पत्रकार परिषदेत केलेल्या वक्तव्याचा अनुवाद मागवला आहे. निवडणूक आयोग उद्धव ठाकरेंची संपूर्ण पत्रकार परिषद तपासून पाहणार आहे. तसेच उद्धव ठाकरे यामध्ये काय म्हणाले आणि त्यांनी निवडणूक आचारसंहितेचा भंग केला आहे का, याची तपासणी करण्यासाठी निवडणूक आयोगाने त्यांच्या विधानांचे मराठीत भाषांतर मागितल्याचीही माहिती आहे.दरम्यान, सोमवारी मुंबईत मुंबईत संथ मतदानाची अनेक उदाहरणे समोर आल्याने उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. सरकार लोकांना मतदानापासून परावृत्त करत असल्याचे त्यांनी म्हंटले होते. यानंतर मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. उद्धव ठाकरेंनी निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केले आहे आणि निवडणूक अधिकाऱ्यांना धमकावले आहे, असे आशिष शेलार यांनी म्हंटले होते.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तपासणी कोण करणार आणि उद्धव ठाकरे जे बोलले ते आचारसंहितेचे उल्लंघन आहे की शेलार यांच्या आरोपानुसार लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत कारवाईसाठी जबाबदार आहे हे निवडणूक आयोग ठरवेल. ठाकरे यांनी सोमवारी जे सांगितले त्याचा अनुवाद आम्हाला पाठवण्यास सांगण्यात आले आहे, असे एका निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



# द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या प्रयत्नाने भेटला वार्ताहाराला न्याय

लोकनेता न्यूज नेटवर्क

शिरुर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील आमदाबाद येथील वार्ताहार प्रकाश वसंत पवार यांची माजी सरपंच तसेच नवनिर्वाचित सदस्य यांचा मुलगा यांनी नाहक बदनामी करत सगळ्या पंचक्रोशीत चर्चे ला उधान आणले होते. वार्ताहाराने बातम्या छापू नये म्हणून काही राजकीय मंडळीच्या सांगण्याने सत्याची बाजू मांडणाऱ्या वार्ताहाराची बदनामी केली. संबंधित चर्चेचा प्रकार त्याच्या लक्षात येताच त्यांनी याबाबत संबंधीताशी संपर्क केला आसता त्यांनी त्याला जीवे मारण्याची धमकी, शिवीगाळ केली. मानसिक मानहानी झाल्याने त्यांनी शिरूर पोलीस स्टेशनला दि.२१/५/२०२४ रोजी तक्रार




अर्ज देत पुणे जिल्हाध्यक्ष शौकत शेख यांनी पवार यांची भेट घेउन गुन्हा दाखल होईपर्यत पाठपुरवठा केला तसेच पदाधिकार्यांनी पोलीस निरिक्षक ज्योतीराम गुंजवटे यांची भेट घेवून सर्व प्रकार सांगितला.

द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांनी संबंधित विषयाबाबत चर्चा करून योग्य न्याय देण्याची मागणी केली. पुणे जिल्ह्यासह तालुक्यातील पत्रकार सदस्य व शिरुर तालुकाध्यक्षांनी देखील पाठबळ देत पत्रकार कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. दि.२२/५/२०२४ रोजी संबंधितांनवर गुन्हा नोंद करण्यात आला. पत्रकारांनवर हल्ले, अन्याय होत असल्यास त्यांनी द युवा ग्रामीण पत्रकार संघ केव्हा ही पत्रकारांच्या पाठीशी उभी असुन कायदेशीर मार्गदर्शन करणार तसेच विविध पत्रकार संघांनाही ते नेहमीच पाठींबा देणार आसल्याबाबत संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांनी संगितले. राज्य सह सचिव विवेकानंद फंड यांनी राज्यात पत्रकारांचे संघटन करून त्यांच्या विविध समस्या सोडवण्यास आम्ही कटीबद्ध राहणार आसल्याचे सांगितले. वार्ताहाराला न्याय मिळावा म्हणून द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या पदधिकाऱ्यानी पाठींबा देत मोलाचे योगदान दिले.

# मत मोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण



लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता १५-हिंगोली लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी शासकीय तंत्रनिकेतन इमारत एमआयडीसी परिसर लिंबाळा मक्ता जिल्हा हिंगोली येथे होणार आहे. या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या वेळी मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना सर्व बाबींची माहिती देण्यात आली. तसेच मतमोजणी कक्षामध्ये कोणालाही भ्रमणध्वनीचा वापर करता येणार नसल्याचे सांगितले.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, महागावचे तहसीलदार सिद्धेश्वर वरणगावकर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश जामनोर, नायब तहसिलदार वैभव पवार, नायब तहसिलदार आर एम पंधरे, मंडळ अधिकारी संजय वाघमारे, मंडळ अधिकारी संजय नरवाडे, वसंत बोदगिरे यांच्या उपस्थितीत आज तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये प्रशिक्षण पार पडले.

# कंधार येथे बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

## बुद्ध गीत व मंगलमैत्री गीताने शहर दुमदुमले

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

विश्वाला अहिंसा,सत्य,क्षमा आणि मानवतेचा महान संदेश देऊन दु:ख मुक्तीचा मार्ग सांगणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ व्या जयंती तथा बुद्ध पौर्णिमा गुरूवार दि.२३ मे रोजी कंधार येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा कंधारच्या वतीने मोठ्या उत्साहात व शांततेत साजरी करण्यात आली.बुध्द गीत मंगलमैत्री गीताने शहरातील वातावरण बुद्धमय झाले होते. कंधार शहरांतील भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ सकाळ पासूनच बुद्ध पौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने हजरी लावलीहोती. या कार्यक्रमांच्या प्रारंभी भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष विलास अण्णा कांबळे,माजी नगरसेवक डॉ.दिपक बडवणे यांनी तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस तसेच डॉ.बाबा साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर सामुहिक भिमस्मरण,भिमस्तुती, त्रिसरण,पंचशील ग्रहण करण्यात आले.यावेळी



भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस नामदेव कांबळे, कोषाध्यक्ष जितेंद्र ढवळे,शहराध्यक्ष निलेश गायकवाड,वंचित बहुजन आघाडीचे तालुका महासचिव रुपेश कांबळे,माजी मुख्याध्यापक सुधाकर सोनकांबळे, सी.डी.सोनकांबळे, आर.एन.गायकवाड, ड.सुहास मस्के, नाना गायकवाड,अविनाश कंधारकर, अनिल सूर्यवंशी, आनंदराव कांबळे आदीसह अनेकांनी तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.सायंकाळी नंतर सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर स्मारक भीमगड येथून तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीची भव्य धम्म ज्योत रॅली काढण्यात आली.या रॅलीत बौद्ध धम्माचा विजय असो,भिक्खू संघाचा विजय असो असा जयघोष अधूनमधून करीत बुद्ध गीत व मंगलमैत्री गीताने कंधार शहर दुमदुमून गेले होते.ही धम्म ज्योत रॅली शहरातील बसस्थानक मार्ग महाराणा प्रतापसिंह चौक,सिध्दार्थ नगर,साठे नगर,गांधी चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक या मुख्य रस्त्याने काढून बाबासाहेबांच्या पुतळ्या ठिकाणी या रॅलीचा समारोप करण्यात आला.या धम्म ज्योत रॅलीत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून आंबेडकरी,बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्युत पुरवठा सुरळीत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे

## विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल

लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे

दानापूर या परिसरामध्ये भीषण पाणी टंचाई असल्याने या परिसरामध्ये टँकर धारकामुळे पाणी मिळत पण लाईट सुरळीत नसल्याकारणाने टँकरच्या रांगा लागत आहे, भोकरदन येथील ट्रांसफार्मर जळाल्याने विद्युत पुरवठा, कभी आव , कभी जाव सध्या टेंपरेचर ४२,४३ अंश डिग्री सेल्सिअस असून गरमाट वाढलेले आहे लाईट असली तर माणूस घरामध्ये बसू शकते, कुटुंबामध्ये छोटी छोटी मुले गरमाटामुळे त्रस्त झाले आहे भोकरदन येथील ट्रांसफार्मर जळाल्याने लाईट सुरळीत चालू नाही शेतकरी जगाचा पोशिंदा जगाचा पालन हार यंदा अत्यल्प पावसामुळे विहिरीमध्ये पाणी साठवून मिरचीची लागवड केलेली आहे या ट्रांसफार्मर मुळे दानापूर या परिसरामध्ये मिरचीचे पीक सुकू लागले आहे दुसरा प्रश्न यंदा अत्यल्प पावसामुळे भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे लाईन सुरळीत नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे लाईट सुरळीत नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवत आहे, या परिसरामध्ये सध्या पाणी मिळेल का पाणी असा प्रश्न शेतकऱ्यासमोर पडू लागला आहे,,



**विद्युत पुरवठा सुरळीत नसल्या मुळे टँकरच्या लागलेल्या रांगा**

आत्या अल्प पावसामुळे रब्बी पिकाची लागवड न करता विहिरीमध्ये पाणी साठवून ठेवलं म्हणून पिण्याचा प्रश्न मार्गी लागला, ठिबक सिंचनाच्या माध्यमातून मिरचीची लागवड केलेली आहे एक एकर मिरचीची लागवड करायची असली तर त्या एकराला लागणारा खर्च ७०००० ते ८०००० येतो या परिसरामध्ये मिरचीची लागवड जास्त असल्याकारणाने शेतकऱ्यांना रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करावी लागत आहे शेतकऱ्यांचे पिके सुकू लागले आहेत त्या पिकाला लागणारा खर्च, पिण्याचा प्रश्न, सुरळीत करावा नाहीतर शेतकरी वर्गाकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## चारोळी

मनातील दुखरा कोपरा
योग्य माणसाजवळ उघडा करावा
मोकळं होऊनी त्यात
मस्त मोद भरावा.७

रंजना सानप
मायणी (सातारा)

# वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे

सुशिल शिक्षण संस्था बीड संचलित प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा व वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षी एच.एस.सी निकाल ९६.७० टक्के लागला आहे.

नुकताच १२ वी वर्गाचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून सुशिल शिक्षण संस्था बीड संचलित प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा व वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालचा विज्ञान व कला शाखेचा निकाल लागला असून विज्ञान शाखेचा ९८.०३ टक्के तर कला शाखेचा ९५ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेत परीक्षेत एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यामधील उत्तीर्ण विद्यार्थी ५०, विशेष प्राविण्यासह ०४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ३६ तसेच द्वितीय श्रेणीमध्ये १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम क्रमांक गायकवाड उदयसिंह अविनाश ८२.६७ टक्के गुण मिळविले तर द्वितीय क्रमांक पालवे अभय विजय ७९.५० टक्के, तृतीय क्रमांक चव्हाण चंद्रकांत सुभाष ७६.३३ टक्के गुण मिळवून यशस्वी झाले आहेत. तसेच कला शाखेचा निकाल ९५ टक्के लागला असून कला शाखा परीक्षेस बसलेले विद्यार्थी ४० उत्तीर्ण विद्यार्थी ३८ विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये ०१, प्रथम श्रेणीध्ये ३१, द्वितीय श्रेणीत ०६ असे एकुण ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झालेयामध्ये प्रथम क्रमांक चव्हाण पुजा गुलाबराव ७६.१७ टक्के, द्वितीय क्रमांक राठोड वनिता नवनाथ ७४.६७ टक्के तर तृतीय क्रमांक राठोड करण शिवाजी ७२.८३ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुशील भाऊ पवार, सचिव आदरणीय दिनेश लालाजी पवार, आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पवार आर.डी. तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

संपादकीय

# चांदीला सुवर्णपदक!



जगाने कितीही आर्थिक मजल मारली तरी सोने आणि चांदी या दोन मौल्यवान धातूंचे नाणेबाजार, भांडवली बाजार, गुंतवणूक, वारसा मालमत्ता, तारण यांच्यासहित एकूण अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमी झालेले नाही. किंबहुना, अर्थकारणात अनेक नवनवी विनिमय साधने तसेच गुंतवणूक पद्धती येत असताना सोने आणि चांदी यांचे महत्त्व परस्पर संतुलनाच्या दृष्टीने वाढतच चालले आहे. देशांतर्गत बाजारात सध्या चांदीने मोठी मजल मारली असून जागतिक प्रवाहाचे पडसाद आणि देशांतर्गत मागणीचा जोर अशी दोन्ही कारणे त्यामागे आहेत.दहा ग्रॅम शुद्ध सोन्याची किंमत आणि एक किलो शुद्ध चांदीची किंमत यांचा प्रवास साधारण समांतर चालतो, असे म्हटले जाते; तसे बऱ्याचदा अनुभवासही येते. मात्र, सध्या चांदी बरीच पुढे गेली आहे. चांदीची किंमत बुधवारी काही बाजारांत प्रति किलो ९९ हजारांवर जाऊन पोहोचली. याचवेळी, २४ कॅरेट सोन्याची किंमत ७६ हजार २१५ रुपयांवर गेली होती. सोनेही गेले काही महिने सातत्याने वधारत आहे. त्याला काही जागतिक कारणेही आहेत. त्यातले एक म्हणजे चीनने जागतिक बाजारात सुरू केलेली सोन्याची प्रचंड खरेदी. या खरेदीमागे डॉलर व पर्यायाने अमेरिकेला शह देण्याचा चीनचा हेतू आहे. त्यामुळे, जागतिक सोनेबाजार चढा राहतो आहे. याशिवाय, भारतात सोन्याला मागणी नाही, असा काळच नसतो. सुवर्णवेड हा भारतीयांचा बहुतेक जनुकीय गुणधर्म असावा. मात्र, सोन्याच्या मागणीचा ताण अधिक वाढला की सोन्याचे बरेच ग्राहक चांदीकडे वळतात. लग्नसराईत तर हे हमखास होते. देशांतर्गत बाजारात सोने महागले की चांदी महागण्याचे तेही अनेकदा एक महत्त्वाचे कारण असते.सध्या मात्र मोठे गुंतवणूकदार सोने, शेअर बाजार, बिटकॉइनसहित इतर आभासी चलने यांच्या तुलनेत चांदीचा अधिक परतावा अनुभवत आहेत. हा अधिक मिळणारा परतावाच गुंतवणूकदारांना चांदीकडे आकर्षित करत आहे. याशिवाय, अमेरिकेत औद्योगिक आघाडीवर थोडी संथगती असली तरी चीन, भारतासहित अनेक देशांमध्ये औद्योगिक विकासाची घोडदौड चालू आहे. चांदीची औद्योगिक क्षेत्रातील मागणी हा वाढत्या किंमतीमागचा एक महत्त्वाचा घटक आहे. चांदी अत्यंत कार्यक्षम उष्णतावाहक, वीजवाहक आहे. मोबाइल फोन, वाहन उद्योग, संगणक उद्योग यांच्यासहित असंख्य उद्योगांमध्ये चांदीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या मागणीचा ताणही चांदीच्या किमतीवर सध्या येतो आहे. सोन्यापेक्षा चांदीच्या उपयोजनाची क्षेत्रे कितीतरी अधिक आहेत. औद्योगिक वापरासाठी पडणारा चांदीचा तुटवडा हा आजचा नाही. गेले दशकभर हा क्रम चालू आहे. मध्यंतरी काही काळ चांदीचा पुरवठा मागणीइतका झाला. पण गेल्या वर्षी, म्हणजे २०२३मध्ये चांदीच्या जागतिक पुरवठ्यात १८४ दशलक्ष औंस (एक औंस म्हणजे २८.३४ ग्रॅम) तुटवडा पडला. हीच स्थिती यंदाही कायम आहे. साऱ्या जगभरात पर्यायी उर्जेच्या निर्मितीचा वेग वाढतो आहे. त्यातही सौर उर्जेवर शाश्वत मार्ग म्हणून भर आहे. सौरपत्र्यांचे उत्पादन जितके वाढत जाईल, तितकी त्यासाठी लागणाऱ्या चांदीची मागणीही वाढत जाणार आहे.मेक्सिको, चीन आणि पेरू हे जगातील सगळ्यांत मोठे चांदी उत्पादक देश आहेत. हे तिघे मिळूनच जगातील ४० टक्के चांदी खणून काढतात. चांदीचे दरवर्षी होणारे सरासरी २६ हजार टन उत्पादन कमी पडते आहे. या उत्पादनाची मर्यादा, वाढती औद्योगिक मागणी आणि दागिने तसेच धार्मिक गरज या सर्व आघाड्यांचा ताण पाहता पुढील काही वर्षे चांदी अधिकाधिक चमकत जाणार आहे; असे जगभरातील अभ्यासकांना वाटते. यामुळे, चांदी आणि सोने यांच्या किमतीमधील तुलनात्मक समांतर वाटचाल कायमची संपण्याची शक्यता आहे. भारतीय ग्राहक चांदी आणि सोने यांच्या भाववाढीला अनेकदा बाजारपेठीय चौकटीच्या बाहेरचा प्रतिसाद देतो. म्हणजे, चालू वर्षी चांदी व सोने यांची अशीच चढती भाजणी राहिली तर लाखो भारतीय कुटुंबे शिलकीतले सोने व चांदी बाहेर काढतील आणि लग्नसराई धकवून नेतील, असे म्हटले जाते. असे झाले तर चांदी व सोने या दोन्हींची आयात घटू शकते. जुने सोने बाहेर येऊन नवीन दागिन्यांचे रूप लेऊ लागल्यास सोन्याची किंमत घसरली नाही तरी स्थिरावू शकते. सोने स्थिरावले तर चांदीही मग स्थिरावेल. सोने व चांदी यांच्या भावांचा विचार करताना या दोन्ही धातूंमध्ये होणारी काळ्या पैशाची गुंतवणूक लक्षात घ्यावी लागते. या दोन्ही धातूंचे भाव कितीही वाढले आणि दुसरीकडे काळ्या पैशाची निर्मितीही होतच राहिली तर वाट्टेल त्या किमतीला खासकरून सोने विकत घेतले जाते. या आणि पुढच्या वर्षी मात्र चांदी टक्केवारीच्या प्रमाणात सोन्याला मात देईल, असे जगभर मानले जाते. चांदीच्या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा किती तरी अधिक असेल. सध्याच्या जगभरातील व भारतातील रौप्यझळाळीचा अर्थ तो आहे.

# काम मोलाचे की प्रचार ?

आता कोणत्याही प्रचारात मुद्दे, प्रश्न महत्त्वाचे नसतात. पॅकेजिंग आणि माणसांचे सादरीकरण महत्त्वाचे असते. अमेरिकेतील अध्यक्षीय प्रचारातही तेच होणार आहे. बायडेन आणि ट्रम्प या उमेदवारांच्या पहिल्या चर्चेतून आता हे दिसेलच.अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि त्यांना आव्हान दिलेले माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षीय चर्चेत भाग घ्यायला नुकतीच मान्यता दिली. २७ जूनची पहिली चर्चा सीएनएन अटलांटा स्टुडिओत आहे. दुसरी १० सप्टेंबरला एबीसी वाहिनीवर आहे. चर्चेच्या नव्या आयोजनात प्रेक्षकांचा लाइव्ह सहभाग नसेल. एका उमेदवाराचे भाषण चालू असताना दुसऱ्याचा माईक बंद असेल.हा बदल का? कारण सन २०२० च्या निवडणूक चर्चेत डोनाल्ड ट्रम्प हे बायडेन यांच्या भाषणात अडथळे आणत होते, तिरकस शेरेबाजी करत होते. सूत्रसंचालकाचे ते काहीही ऐकत नसत. अमेरिकेत निवडणूक मोहीम वर्षभर चालते. उमेदवार देशभर फिरून पक्षातर्फे उमेदवारी मिळवतात, नंतर प्रचार करतात. त्यामुळे अध्यक्षीय उमेदवार ही काय चीज आहे, ते लोकांना आधीच माहीत असते. महत्त्वाचे प्रश्न आणि त्यावर उमेदवारांची मते लोकांना कळतात.अमेरिकेत ७९ टक्के साक्षरता आहे. १० कोटी लोकांकडे व्हॉट्सप आहे. पाच कोटी लोक रोज ते पाहतात. ३१ कोटी लोक इंटरनेटचा वापरतात. रोज एकदा तरी फेसबुकवर जातात. सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रत्येक माणसाकडे पोहोचलेला आहे. माध्यमे अहोरात्र देशातली अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था यांची माहिती ओतत असतात. यातली किती माहिती खरी आणि किती खोटी, याचा हिशोब लागत नाही, पण माहिती पोहोचते. बायडेन आणि ट्रम्प यांच्याबद्दलची समजूत निराधार किंवा चूक असू शकेल, पण प्रत्येक माणसाची रोज नवी समजूत तयार होत असते. मग या चर्चेतून काय निष्पन्न होणार?सन १८५८ साली अब्राहम लिंकन आणि स्टीफन डग्लस या दोन अध्यक्षीय उमेदवारांत जाहीर चर्चा झाली होती. दोघेच मंचावर, श्रोते सभागृहात. प्रत्येकाला दीड तास मिळाला. फक्त इलिनॉय राज्यात सहा शहरांत चर्चेच्या फेऱ्या झाल्या. पेपरांचा प्रसार झाला असला तरी अमेरिकाभरातील जनतेला या चर्चेची माहिती तेव्हा मिळाली असणे कठीण आहे. नंतर थेट सन १९४० साली चर्चेचे रूप बदलले. रेडिओवर चर्चा सुरू झाल्या. तेव्हा अमेरिकेत ७५ टक्के लोकांकडे



रेडिओ होता. सगळा देश एकाच वेळी चर्चा ऐकू शके. तेव्हाचे अध्यक्ष रुझवेल्ट यांना विल्कीस या नेत्याने चर्चेचे आव्हान दिले. रुझवेल्ट तयार झाले नाहीत. त्यांनी जनतेला उद्देशून रेडिओवर भाषणे सुरू केली. त्यांची रेडिओवरील 'फायर साईड चॅट' भाषणे लोकप्रिय झाली.टीव्ही आल्यानंतर सन १९६० साली पहिली अध्यक्षीय टीव्ही चर्चा झाली. उपाध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सेनेटर जॉन एफ. केनेडी हे उमेदवार होते. सात कोटी लोकांनी टीव्हीवरची ती चर्चा पाहिली. चर्चेत त्या काळातले वादग्रस्त विषय होते. कम्युनिझमचा प्रसार, राष्ट्रीय सुरक्षा, वर्णद्वेष, व्हिएतनाम युद्ध वगैरे. प्रत्येकाची एक टीम होती. भाषणाचे मुद्दे, बोलण्याची पद्धत, आक्षेप कसे घ्यायचे, शब्दफेक, दिसणे, कपडेपट इत्यादी बाबतीत व्यावसायिक तज्ज्ञ टीममधे होते. केनेडी सल्लागारांचे ऐकत. निक्सन मनास वाटेल तसे वागत. त्यांना वाटे की, त्यांना सगळे समजते. कोणी काही सांगू नये. स्टुडिओत पोचताना निक्सन यांना १०२ ताप होता. काही दिवस आधी कारमधून उतरताना त्यांचा गुडघा कारच्या दरवाजावर आदळला होता. काही दिवस हॉस्पिटलात रहावे लागले होते. त्यातून अशक्तपणा आला होता. डॉक्टरांचा विश्रांतीचा सल्ला धुडकावून त्यांनी चर्चा केली. चर्चेच्या वेळीही कारमधून उतरताना तोच दुखरा गुडघा पुन्हा दरवाजावर आदळला. ते विव्हळतच स्टुडिओत पोचले. निक्सन यांचा ग्रे रंगाचा सूट स्टुडिओतल्या पडद्याशी जुळत नव्हता. निक्सन यांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या. दाढीचे खुंट वाढले होते. निक्सन यांना तो विकार होता. चकाचक दाढी करून ते तयार होत आणि तासाभरात दाढी पुन्हा वाढे. चेहऱ्यातले दोष झाकणारे अत्याधुनिक मेकअपवाले आले होते. निक्सन यांनी त्यांच्याजवळ असलेला कामचलाऊ मेकअप वापरला. निक्सन सतत पडते घेतल्यागत बोलत होते. केनेडी यांच्या चमूने मेकअप व्यवस्थित केला. केस नीट सेट केले. केनेडी कॅमेऱ्यात एखाद्या हिरोसारखे उत्साही आणि आनंदी दिसले. स्टुडिओत केनेडींचा शर्ट नेपथ्यात मिसळत होता म्हणून एक कार धावत हॉटेलवर गेली आणि निळा शर्ट घेऊन आली. केनेडी आत्मविश्वासाने बोलले.नंतर नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेणाऱ्या पहाण्या झाल्या. नागरिक चर्चेवर बोलले नाहीत. निक्सन आणि केनेडी कसे दिसले, यावरच बोलले. चर्चा संपवून उमेदवार बाहेर जात असताना सूत्रसंचालक म्हणाला, 'केनेडींना अध्यक्ष होण्यासाठी मतदानाची वाट पाहायला नको. ते आताच अध्यक्ष झालेत.'निक्सन यांनी पुढे पुस्तकात लिहिले, 'माझी चूक झाली. मी मुद्द्यांचा विचार केला पण दिसण्याचा नाही. एक चित्र हजार शब्दांच्या बरोबरीचे असते, हे मी विसरलो.' उमेदवाराचे रूपांतर वस्तूत करून ती विकण्यात आली. उमेदवाराचे पॅकेजिंग झाले. केनेडी ही वस्तू माध्यमांनी विकली. निक्सन निवडणूक हरले.आता १९६० ते २०२४ या काळात माहिती तंत्रज्ञानाने मुसंडी मारली आहे. या तंत्रज्ञानानं माणसाचा मेंदूच ताब्यात घेतला आहे. कितीही खोटे बोला, फक्त चांगले दिसा. अमेरिकेत आता प्रत्येक गोष्ट इव्हेंट झाली आहे. उमेदवार कसा दिसतो, कसा वागतो, त्याची आत्मविश्वास पातळी कशी आहे, इत्यादी गोष्टी पाहायला लोकांना आवडते. कसे ठोकून काढले, कशी पळता भुई थोडी केली, कसा केविलवाणा दिसत होता, कसा अडखळत होता, कसला फँटास्टिक कॉन्फिडन्स होता इत्यादी इत्यादी उद्गार काढण्याची सोय या चर्चेमुळे होते.बायडेन यांच्याकडे एकसंध राजकीय-आर्थिक धोरण नाही. डेमॉक्रॅटिक पक्षातही तीव्र मतांतरे आहेत. ट्रम्प यांच्याबद्दल तर बोलायलाच नको. धोरण, विचार, तर्क, विश्लेषण इत्यादी गोष्टींशी त्यांचा संबंधच नाही. रिपब्लिकन पक्षातही खूप गट आहेत, गोंधळ आहेत. अमेरिकेतले प्रश्न फार गुंत्याचे आणि बिकट आहेत, अमेरिकेत कोणाही जवळ त्या प्रश्नावर उत्तर नाहीये. सारा गोंधळच आहे. हा गोंधळ अमेरिकन नागरिक गेली चार वर्षं अनुभवत आहेत. बायडेन व ट्रम्प हे दोघेही वृद्ध आहेत. दोघांची प्रश्न सोडवण्याची क्षमता नाही, हे जगाला कळले आहे. ते काय चर्चा करणार?ट्रम्प हे अधिक उद्दाम दाखवले तर मतदारांना आवडतील की जरासे नेमस्त करून विकणे ठीक ठरेल, याचा निर्णय व्यावसायिक लोक घेतील. बायडेन अडखळतात, मधेच विसरतात, नीरस बोलतात. ते दोष दूर कसे करायचे, एक वृद्ध पण अनुभवी आणि शहाणा अशी प्रतिमा टीव्हीवर कशी आणायची, याची व्यवस्था बायडेनवाल्यांना करायची आहे. सन २०२० ची निवडणूक अटीतटीची होती. काही हजार मतांनी बायडेन यांनी जॉर्जिया जिंकले. हा विजय निसटता होता. तेच ट्रम्प यांचे दुःख आहे. भरघोस मताधिक्याने पडते तर ट्रम्पना दुःख वाटले नसते. आताही बायडेन आणि ट्रम्प यांच्या लोकप्रियतेत फारच थोडा फरक आहे. लोकांची मते ठरलेली आहेत. सगळी खटपट चालेल ती मतदारांना घराबाहेर काढण्याची. गेल्या निवडणुकीत आठ कोटी लोकांनी मतदान केले नाही. कोणाचे किती समर्थक हिरिरीने मतदानाला बाहेर पडतात; यावर सारे अवलंबून आहे.

# प्रेरणास्थान

घाई गर्दीत घेतलेले निर्णय चुकीच्या मार्गाने जाणारे असतात. मग ते अपयशाचे एक कारण होवू शकते. संयमाचा बांध फुटू द्यायचा नसतो. नसता असलेले पाणी ही त्यात वाहून जाण्याची शक्यता असते
इतरांसाठी प्रेरणास्थान बनण्यासाठी स्वतः आदर्श कर्म करून प्रयत्नाने शिखर गाठावे लागते. शिखर गाठले तरी पाय जमिनीवरच ठेवावे लागतात. सन्मार्गी संघर्ष करावाच लागतो. काट्याकुट्याच्या मार्गातून वाट काढावी लागते. प्रामाणिकपणे प्रयत्नातूनच पुढे झेपावण्याचा संकल्प करुन पूर्णत्वास न्यावा लागतो. त्यासाठी समर्पण भावना जागृत ठेवून मृगजळामागे धावणे टाळावे लागते. नव्हे तशा प्रलोभनाचा मोह टाळावा लागतो. कर्माची पूर्तता करताना आपल्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनाचा आदर, मान, सन्मान ठेवूनच विजयश्रीच्या पायऱ्या चढाव्या लागतात. प्रत्येक पर्याय आनंदाने, निष्ठेने, आत्मविश्वासाने निवडावा लागतो.घाई गर्दीत घेतलेले निर्णय चुकीच्या मार्गाने जाणारे असतात. मग ते अपयशाचे एक कारण होवू शकते. संयमाचा बांध फुटू द्यायचा नसतो. नसता असलेले पाणी ही त्यात वाहून जाण्याची शक्यता असते. सक्रीयतेने आपली भूमिका बघता आली पाहिजे. आपल्या कार्यपुर्तीसाठी राग. द्वेष, इतरांची निंदा किंवा स्पर्धा टाकून आत्मसंयमाचेच अनुकरण सहकार्याच्या भावनेला प्राधान्य देवून नैराश्याला टाळून मन शांत, एकाग्र ठेवून आपले पाऊल उचलावे लागतात. नाते, मैत्री हळुवार प्रेमाणे जिंकावी लागतात. स्नेह पूर्ण पोषक वातावरण स्वकर्तृत्वाने निष्काम वृत्ती ठेवून निर्माण करावे लागते. आपले ज्ञान सकारात्मक वृत्तीने जपून त्याचे ज्ञानदानाच्या माध्यमातून समृद्ध करावे लागते. आपल्या यशामध्ये सामाजिक श्रमाचा वाटा आहे ह्याचा विसर न झाला पाहिजे. सक्रियता न सोडली पाहिजे. दुसऱ्याच्या सुखाचा विचार करीत आपण सुख अनुभवले पाहिजे. चारित्र्य संपन्न राहणे केव्हाही सुकर प्रवासाची नांदी आहे. आळसापासून दूर राहून नेहमी क्षमेचा अवलंब केला पाहिजे. कारण आनंदाची उधळण सतत मनात राहीली



पाहिजे, मग अंधार जवळ फिरकणार नाही.दुसऱ्याचे दुःख जाणून घेण्याची व त्यावर उपाय करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंदी समाधानी लाटांची लयलूट निर्माण करण्याचे कौशल्य आपल्या अंगी प्रामुख्याने असावे लागते व तसे सत्कर्म करण्याचा परिपाठ असावा लागतो. नुसत्या वल्गनेने काम भागत नसते हे केव्हाही विसरले न पाहिजे. तप, त्याग, संयमाचे अधिक अधिष्ठान ठेवावे लागते.ह्या सर्व गोष्टीचा अवलंबाबरोबरच स्वआरोग्याकडे लक्ष द्यावे लागते. आहार विहार पाळावे लागतात. निसर्गाची हितगुज साधावे लागते. पशुपक्षांची दखल घेवून त्यांच्या मध्ये काही कार्य काळ घालवून त्यांची सेवा करावी लागते. त्यांच्या मुक्या भावना मनस्वी समजून घेतल्या पाहिजेत. अशा विविध विचारांच्या अंगातून आपली संस्कृती विचारसरणी जपावी लागते. तरच आपण इतरांसाठी प्रेरणा स्थानाला प्राप्त होवू शकतो हे मात्र खरे आहे ह्याची जाणीव आपल्या अतर्मनात बाळगली पाहिजे.
स्तुतीमुळे हरवून न जाता आपण आपल्या ध्येय धोरणापासून विचलीत न होता त्याचा निष्ठेने पाठपुरावा केला पाहिजे. आपल्यातील ज्ञानसुगंध आपल्याला येत नसतो. तर आपण प्रेरणास्थानापर्यंत कसे पोहचू शकता? तो सुगंध इतरांना कसा देता येईल. ह्याचा विचार करणे महत्वाची बाब आहे. आपल्या विचार आचारांचे सुखद तरंग इतरापर्यंत कसे पोहोचतील ह्याची दक्षता घेवून त्याप्रमाणे नियोजन केले पाहिजे. सकारात्मक भावनेतून मनाला समाधान मिळून सुख उर्जा प्रसवते. त्यामुळे आपल्यातील असलेले शडरिपू आपोआप दुरावतात व आपल्या मनात इतराबद्दल प्रेम आपुलकी निर्माण होवून त्या माध्यमातून आपल्यातील ज्ञान सुसंस्कृतपणा इतरांपर्यंत नकळत पोचवला जातो, त्यामुळे समोरच्याला आनंद तर होतोच पण आपले मन देखील सक्रीय राहते. नकळत आपण समोरच्यासाठी आनंदी प्रेरणा देणारे ठरतोच.आपण स्वतः रागापासून आणि संशयवृत्तीपासून आणि अहंकारापासून दूर राहणे खूप गरजेचे आहे. कारण त्या वृत्ती अंगीकारणे म्हणजे आपले जीवन निरर्थक करून ठेवणेच होय त्यामुळे आपण कधीच कोणाला प्रेरणादाई ठरणार नाही. ह्यात संशय नाही. ह्याबद्दल अनेक संतानी अनेक ठिकाणी उदाहरणासहित आपल्याला वेळोवेळी उपदेशीले आहे. आपण केलेला परोपकार किंवा परसेवा ह्यांचा कधीच उल्लेख स्वतःहून न केला पाहिजे, तरच आपली वृत्ती प्रेरणादायी ठरेल. एका हाताने केलेले दान दुसऱ्या हाताला न समजले पाहिजे हे वाक्य सदैव स्मरणात ठेवून आपण दूरदृष्टी ठेवून वागले पाहिजे. तरच आपण इतरांसाठी प्रेरणादायी ठरु शकतो. इति मे मे कुर्वाणम, कालवृको हंती पुरुषार्थ ह्याचा संयम ठेवून विचार करुन व्यवहारात वागावे. आपली वृत्ती प्रेरणादायी व्हावी अशी मनस्वी गाठ बांधून जर आपण समाजात रहात असू तर ही आपली सर्वांत चूकीची वृत्ती आहे. समाजाभिमूख वावरताना समाज ह्या दुःख भव सागरातून सुरक्षितपणे कसा बाहेर पडेल त्यासाठी आपले निस्पृह योगदान देणेच अग्रक्रमाने अंगिकारले पाहिजे. मातृ-हृदयाने समाजाच्या प्रश्नांची करुन आत्मविश्वासाने सकारात्मक विचार करुन जोडली पाहिजे आणि आनंद निर्माण केला पाहिजे. आपण केलेले कृत्य त्यांच्यावर दडपण आणणारे नसावे.भगवंतांनी जसे अर्जुनाला नैराश्यातून वर काढले अनेक मार्गांनी १८ अध्यायातून गीतेमधुन शिक्षण देवून जागृती केव्हा पण आपले निर्णय त्याच्यावर लादले नाहीत, तर अंतिम निर्णय तुझा आहे, हे म्हणून प्रेमाणे सांगितले आहे. म्हणजे कोणतेही दडपण अर्जुनावर ठेवलेले नव्हते. म्हणून ते मार्गदर्शक प्रेरणास्थान ठरले. इतकेच नाही पण थोड्याशा प्रमाणात जमले तरी आपली प्रेरणा निश्चितपणे लोक जाणीवपूर्वक आचरणात आणतील. शिवरायांचे बोलके उदाहरण आपल्या समोर आहे. त्याचाही आपण आधार घेऊन आपली प्रेरणास्थान मिळवू शकतो. मला प्रेरणास्थान माना म्हणून प्रचार केल्याने ते कधीच मिळत नसते, उलट त्याविचारापासून आपणच आपल्याला दूर लोटीत असतो. बिन मांगे मोती प्राप्त होत असतो अर्थात ईश्वर ज्ञानावर ठाम विश्वास ठेवून आपले आहे ते सकारात्मक वागणे चालू ठेवले पाहिजे.

# ताबामारीचा आरोप असलेल्या वाणी नगरच्या शेत जमीनीचा वाद पेटला

**अहमदनगर | दैनिक राज आनंद**

सावेडी, वाणीनगर येथील शेत जमीनीचा वाद चांगलाच पेटला असून, स्थानिक महिलांनी थेट ताबामारी करणाऱ्या गुंडांना तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभय देऊन जमिनीचा बेकायदा ताबा घेण्यासाठी संगणमताने कटकारस्थान करत असल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी महिलांनी थेट पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन याप्रकरणी जागा बळकाविणाऱ्यांसह पोलीस निरीक्षकांवर कारवाई करण्याची मागणी केली व न्यायालयाचा आदेश नसताना जागा खाली करण्यासाठी त्या पोलीस निरीक्षकांचे इंटेरस्ट काय? असल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे.
मौजे सावेडी येथील गट क्रमांक २५ १ अ, ब, क, ड या शेतजीमीत वेणुबाई वाणी या मागील ५० वर्षापासून राहत असून, शेती करत आहे. महसूल दप्तरी या जागेवर नोंद देखील आहे. डाळमंडई येथील दोन व्यापाऱ्यांनी सदर जागेवर ताबा मारण्याच्या उद्देशाने मोजणीचे



तातडीने पैसे भरून मोठ्या पोलीस बंदोबस्तामध्ये राहत्या घरावर व शेत जमिनीचा बेकायदा ताबा घेण्यासाठी आले होते. याप्रकरणात तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्याशी संगनमत करुन त्या व्यापाऱ्यांनी मोठा पोलीसांचा फौजफाटा आनला होता. जागेत बळजबरीने बेकायदा प्रवेश करुन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महिलांना लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील भाषा व अपशब्द वापरण्यात आल्याचे तक्रारदार वेणुबाई वाणी यांनी निवेदनात म्हंटले आहे.
जागेचा ताबा घेण्यासाठी सक्षम न्यायालयाचा आदेश नसताना व जागेवर कंपाऊंड करण्यासाठी महापालिकेची कोणतीही परवानगी नसताना पोलीस मदत घेऊन फक्त दहशतीने ताबा मारण्याचा कट रचण्यात आला होता. पोलीस निरीक्षक यांना मॅनेज करुन त्यांनी देखील पदाचा गैरवापर केला असून, या सर्व घटनांचे सीसीटीव्ही फुटेज रेकॉर्डिंग असल्याचे म्हंटले आहे.
याप्रकरणी शेत जमीनीवर ताबा मारण्याचा प्रयत्न करणारे व्यापारी व महिलांना दमदाटी करुन धक्काबुक्की करणारे पोलीस निरीक्षकांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महिलांनी केली आहे. यावेळी वेणुबाई वाणी, रामदास वाणी, मोहन वाणी, भगवान वाणी आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### आमदार राहुल कुल यांनी केली अपघातग्रस्तांना मदत

# देव तारी त्याला कोण मारी दुचाकी स्वराचा भांडगाव येथे झाला अपघात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

पुणे- सोलापूर महामार्ग भांडगाव (ता.दौंड) येथे दुचाकीवरून जाणाऱ्या परप्रांतीय कामगारांचा अपघात झाला, त्यावेळी तेथून जात असताना त्याठिकाणी गाडी थांबून दौंड चेआमदार राहुल कुल यांनी अपघातग्रस्तांची विचारपुस केली. त्यांना रुग्नावाहीकेमध्ये बसवून पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय,यवत येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालय ससून,पुणे येथे पाठवले व संबंधित डॉक्टर्स यांना तातडीने उपचार करण्याच्या सूचना देखील केल्या.

आमदार राहुल कुल म्हणाले की मी माझ्या ड्रायव्हरला आणि बॉडीगार्डला सांगूनच ठेवलंय.मी गाडीत झोपलो असेन किंवा इतर कामात मग्न असेन आणि रस्त्यात एखादा अपघात झालेला दिसला तर लगेच गाडी थांबवा.जखमींना हॉस्पिटलमध्ये पोहचवण्यास मदत करा.शेवटी जीव वाचणं महत्त्वाचं आहे. रस्त्यात एखादा अपघात झाला तर,तत्काळ गाडी थांबवून अपघातग्रस्तांना मदत करा.थोडा उशीर होईल,पोलीस स्टेशनला जबाब नोंदवावा लागेल, हॉस्पिटलमध्ये सह्या कराव्या लागतील याचा विचार करू नका.अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहचविणे महत्वाचे आहे.यावेळी विनामुल्य रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री.दत्त रुणवाहिका सेवा यवत आणि संदीप दोरगे यांचे देखील राहुल कुल यांनी आभार व्यक्त केले.



### रूग्णाचा अर्धवट उपचार करून डिस्चार्ज

# आयकॉन हॉस्पिटलचे डॉ.असिफ विरुद्ध सिटी चौक पोलीस ठाण्यात तक्रार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**




रोज पार्क, मजनु हिल रोड, गणेश कॉलनी समोर,टी.व्ही.सेंटर रोडवर असलेल्या आयकॉन हॉस्पिटल मध्ये अंध असलेल्या व आपल्या आत्या असलेल्या फातिमा बेगम यांना इंजि. वहिद शेख यांनी उपचारासाठी दाखल केले. चार दिवस साधारण वार्डात भरती करून उपचार व तपासणी करण्यात आली. ह्यात सह्याद्री डायग्नोस्टीक सेंटरमध्ये मेंदूचा एम.आर.आय.काढण्यात आले. यात मेंदूत गाठ असल्याचे एम.आर.आय.मध्ये दिसून आले. सदर गाठ हि कॅन्सरची असल्याचे डॉ. असिफ यांचे म्हणणे आहे.यावेळी मेंदूची शस्त्रक्रिया करून गाठ काढावी लागेल. तीन लाख रुपये अगोदर कॅशियर कडे जमा केले तर दहा मिनिटांत रूग्णाला ऑपरेशन थिएटरमध्ये घेतो असे सांगितले. परंतु फातिमा बेगम ह्या वयस्कर असून त्यांची देखभाल दोन भाचे करतात.परंतू यात तीन लाख रुपये एवढे खर्च कुठून करणार म्हणून फातिमा बेगम यांना शासकीय कर्करोग रुग्णालयात भरती करण्याचे ठरवले.परंतु यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन, रेफर पत्र मागणी केली तेव्हा डॉ.असिफ असभ्य वागणूक देत रुग्णावर योग्य उपचार न करता अर्धवट सोडून डिस्चार्ज दिला असल्याचे इजि.वहिद शेख यांनी राजनिष्ठाशी बोलताना सांगितले व तशी सिटी चौक पोलीस ठाण्यात लेखी तक्रार काल रात्री उशिरादाखल केली आहे.याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक, मिनी घाटी यांच्या कडे ही सिटी चौक पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीची प्रत देऊन रितसर तक्रार दाखल करणार असल्याचे इंजि. वहिद शेख यांनी म्हणाले आहे.

याबाबत डॉ. असिफ यांच्याशी दैनिक राजनिष्ठाने त्यांचे भ्रमणध्वनी वर संपर्क साधला असता तुम्ही हॉस्पिटलला या तुम्हाला सांगतो असे म्हणाले आम्हाला भेटायची काय गरज आहे तुमची बाजू मांडा म्हणल्यावर तुम्हाला काय छापायचे ते छापा मी कोणीही नाही. असे म्हणत भ्रमणध्वनी कट करून टाकला.ह्या आयकॉन हॉस्पिटल च्या पाठीशी एका बड्या मुस्लिम नेत्याचा हात असल्याने आयकॉन हॉस्पिटलचे डॉक्टर रुग्णांसोबत असे लगाम नसल्यासारखे बेछुट बोलतात.असेही सूत्रांकडून समजते.

# वैशाख वणव्यात ‘हा उकाडा सोसवेना’

## छत्रपती संभाजीनगर ४१.४;नागरिक घामाच्या धारांनी हैराण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**



सकाळपासून वाढणाऱ्या झळांमुळे वैशाख वणव्यात होरपळ वाढली असून, हा उकाडा सोसवेना अशी स्थिती आहे. दुपारी तर दमट आणि उष्ण हवामान चांगलेच त्रासदायक ठरत आहे. शहर आणि जिल्ह्यात प्रचंड उकाड्याने अंगातून अक्षरश: घामाच्या धारा वाहत आहेत. दरम्यान, पुढील दोन दिवस पूर्वमोसमी पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

सूर्याच्या तप्त किरणांनी वैशाख वणव्यात जमीन होरपळून निघत असतानाच असह्य उकाड्याने घामाच्या धारा वाहत आहेत. दरम्यान, बुधवार, २२ रोजी छत्रपती कमाल : ४१.४, किमान २८.० अंश सेल्सिअस तर काही ठिकाणी दुपारनंतर काळ्याकुट्ट ढगांची दाटी होत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात पूर्वमोसमीच्या सरी हवेत गारवा आणत आहे. आज (ता. २२) राज्यात उन्हाच्या झळा वाढून उष्ण लाट, दमट हवामानासह पावसाच्या सरीचा शिडकावा होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.हरियाना आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून मध्य प्रदेश ते मराठवाड्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. उत्तर केरळ आणि परिसरावर तसेच उत्तर आंध्र प्रदेशात चक्राकार वाऱ्यांच्या स्थिती आहेत. नैकृत्य बंगालच्या उपसागरापासून कर्नाटक पर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. सोमवारी (ता. २०) सायंकाळी मध्य महाराष्ट्रासह काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते जोरदार पावसाने हजेरी लावली. राज्यात पावसाला पोषक हवामान होत असून, आज (ता. २२) कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. गुरुवार, २३ मे रोजी नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यात उकाडा कायम राहून तुरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि. मी.) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ग्रामीण मौसम सेवा केंद्राचे प्रकल्प संचालक कैलास डाखोरे यांनी कळविले आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार त्यांनी ही माहिती दिली.

# खालील खृटल्यामध्ये दिनांक २१/०५/२०२४ रोजी सेशन कोर्ट छत्रपती संभाजीनगर येथे जन्मठेप शिक्षा सुनावली आहे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आरोपी नामे रामेर बोत व त्याचे दोन्ही तर सहकारी मित्र असे श्री संत एकनाथ साखर कारखाना समोर एका हॉटेलमध्ये भजे खात असताना आरोपी व मयत सांडू शेख यांच्यामध्ये किरकोळ वाद झाल्याने त्या वादामध्ये आरोपी रामेर बोत याने हॉटेलमधील कांदा कापण्याचा चाकू घेऊन मयत सांडू याचे पाठीवर व बरगडी मध्ये चाकूने वार केले. त्यांचे भांडणे सोडण्यासाठी हॉटेल मालक जगन्नाथ जमादार हा मध्यस्थी पडला व दुसरा सहकारी मित्र हा ही मध्यस्थी पडला त्यामध्ये जगन्नाथ जमादार याला किरकोळ दुखापत झाली व आरोपी यांने दोघांना झटका देऊन पळून गेला.त्यानंतर हॉटेल मालक व एका मित्राने मयत सांडू यास घाटी दवाखाना छत्रपती संभाजीनगर येथे दाखल केले दाखल केल्यानंतर औषधोपचार चालू असताना सांडु शेख हा मरण पावला आहे त्यानंतर मयताचा भाऊ शफिक शेख याने पोलीस स्टेशनला आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्या अगोदरच आरोपी हा उसात लपून बसलेले असल्याचे माहिती मिळाल्याने आम्ही पोलिसांनी त्यास उसाच्या शेतामध्ये शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले होते. त्यानंतर ps midc paithan तत्कालीन प्रभारी अधिकारी भागवत नागरगोजे व तत्कालीन उपविभागीय पोलीस आधिकारी उपविभाग पैठण चे डा.विशाल नेहुल यांनी सदर गुन्ह्यात तपास करून आरोपी विरुद्ध खटला माननीय न्यायालयात दाखल केला आहे. सदर खटला सेशन न्यायमुर्ती. श्री. एस.एम.आगरकर साहेबा यांचे कोर्टात छत्रपती संभाजीनगर येथे चालू होता. सदर खटलामध्ये सरकारी वकील म्हणून श्री. ए बी करंडे यांनी कामकाज पाहिले तसेच पोलीस स्टेशन ाळवल रिळींहरप चे पैरवी अधिकारी म्हणुन हवालदार गणेश शर्मा यांनी सदर खटल्यामध्ये कामकाज पाहीले आहे.

# कलम-४ सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी असून यास रु.२०० पर्यंत दंड आकारला जातो

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

कलम-५ तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीवर बंदी आहे. पहिला गुन्हा असेल तर २ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु.१ हजार पर्यंत दंड, दुसरा गुन्हा असेल तर ५ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु.५ हजार पर्यंत दंड होतो.कलम - ६ नुसार अ) १८ वर्षाखालील व्यक्तींना तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी, ब) शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी अशी विक्री होताना आढळल्यास रु.२०० पर्यंत दंड.कलम-७ सर्व तंबाखुजन्य पदार्थाच्या वेस्टनावर निर्देशित धोक्याची सूचना देणे बंधनकारक आहे. जर नसेल तर उत्पादकाचा पहिला गुन्हा असेल तर २ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु.५ हजार पर्यंत दंड, उत्पादकाचा दुसरा गुन्हा असेल तर ५ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु.१० हजार पर्यंत दंड, विक्रेत्याचा पहिला गुन्हा असेल तर १ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु १ हजार पर्यंत दंड, विक्रेत्याचा दुसरा गुन्हा असेल तर २ वर्षापर्यंत शिक्षा व किंवा रु.३ हजार पर्यंत दंड.तंबाखूचे व्यसन सोडण्याकरीता टोल फ्री क्रमांक १८००११२३५६ छापणे बंधनकारक

# यश काले यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार मिळाल्याबद्दल राजाबाजारमध्ये सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**



राजाबाजारमधील खंडेलवाल दिगंबरजैन पंचायत पार्श्वनाथ मंदिरात नाशिक येथील येथील यश सुमेरकुमार काले(आयएफएस) यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकताच डेहराडून येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी येथे पार पडलेल्या सोहळ्यात 'सर्वोत्तम संवाद तथा वक्तृत्वकौशल्य' प्रथम पुरस्कार काले यांनी स्वीकारला.

डेहराडूनच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी घेत असलेल्या भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांचा समारंभ राष्ट्रपती मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. अधिकाऱ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. काले यांचाही समावेश यांना प्रथम पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याबद्दल त्यांचा बुधवारी, २२ रोजी राजाबजार खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, कचनेर क्षेत्र जटवाडा क्षेत्र गुरू परिवार, पूलक मंच पी. यू. विद्यालय आदींच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळेस अध्यक्ष ललीत पाटणी, सचिव अशोक अजमेरा, उपाध्यक्ष विनोद लोहाडे, सहसचिव नरेंद्र अजमेरा, एम. आर. बडजाते, अमोल पाटणी, माणिकचंद गंगवाल, किरण पहाडे, दीपक पहाडे, आर. सी. बडजाते, दिलीप कासलीवाल, अशोक गंगवाल, भरत ठोले, श्रीपाल लोहाडे, आदित्य सोनी, प्रकाश अजमेरा, महावीर पाटणी, माणिकचंद पांडे, राजाभाऊ पहाडे, कैलाश पाटणी, रमेश पाटणी, पियुष कासलीवाल यांचासह समाजबांधवांनी यश काले यांचा शाल श्रीफळ, बुके देऊन अभिनंदननी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सचिव अशोक अजमेरा यांनी केले.

# बारावीच्या निकालात प्रवरेची गुणवता कायम संस्थेच्या १० कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणी । प्रतिनिधी**

लोकनेते पद्मभुषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या इयत्ता बारावीच्या निकालात संस्थेने आपली शैक्षणिक गुणवता कायम राखली असून, संस्थेच्या १० महाविद्यालयांनी निकाल १०० टक्के निकालाची परंपरा यंदाही राखली आहे. विज्ञान १० ,कला २ वाणिज्य शाखेतील ४ तर किमान कौशल्य अभ्यासक्रम शाखेतील २ महाविद्यालयांचा समावेश आहे.,प्रवरेच्या इंग्रजी माध्यमांच्या तीनही शाखांचा निकाल १०० टक्के लागला असल्याची माहीती संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ.लिलावती सरोदे यांनी दिली.लोकनेते पद्मभुषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या १७ कनिष्ठ महाविद्यालाने आपली निकालांची परंपरा कायम ठेवली आहे.यावर्षी २५६० विद्यार्थी पैकी २४६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेचा कला शाखेच्या १२ महाविद्यालयाचा निकाल ८५.१३ लागला असून प्रवरा कन्या विद्या मंदीर लोणी आणि कै.जनार्दन काळे पाटील विद्यालय चिंचोली या कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के लागला असून कला शाखेतून ४१७ पैकी ३५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेच्या महाविद्यालयांचा निकाल ९८.९२ टक्के लागला असून मराठी माध्यमातील छत्रपती शिवाजी महाराज कनिष्ठ महाविद्यालय पाथरे, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालय बाभळेश्वर,डॉ.बाबासाहेब आंबडेकर कनिष्ठ महाविद्यालय,भगवतीपूर या तीन तर इंग्रजी माध्यमातील प्रवरा पब्लीक स्कूल प्रवरानगर,प्रवरा सेंट्रल पब्लीक स्कुल प्रवरानगर,पद्मश्री डॉ.विखे पाटील सैनिकी स्कुल,प्रवरानगर या तीनही महाविद्यालयांचा १०० टक्के लागला असून, १८५१ पैकी १८३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याचे सौ. सरोदे यांनी सांगितले. वाणिज्य शाखेचा निकाल हा ९४.९२ टक्के लागला असून डॉ.बाबासाहेब आंबडेकर महाविद्यालय भगवतीपूरचा निकाल १०० टक्के लागला आहे.

# ह.भ.प दानवे गुरूजी यांचे काल्याचे किर्तन

## ज्ञानाई तुकाई गुरुकुल मध्ये अष्टदिनी नामयज्ञ सोहळा संपन्न







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

माऊली आणि तुकोबारायांच्या कृपेने आणि गुरुवर्य ह.भ.प आदिनाथ महाराज दानवे (गुरुजी) यांच्या आशीर्वाद व मार्गदर्शनाखाली संपन्न झालेला ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड अष्टदिनी नामयज्ञ सोहळा आनंद आणि भक्तीभावाच्या वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्याचे शब्दात वर्णन करणे केवळ अशक्यच. वर्णनातीत आणि शब्दातीत असा हा भक्तीचा जागर ज्ञानाई- तुकाई गुरुकुल मध्ये दिनांक १५ मे ते २२ मे या कालावधीत आयोजित केलेला होता,यामध्ये सर्व लहानथोर,अबालवृद्ध यांनी सहभाग घेऊन अध्यात्मिक आनंदाची अपरोक्ष अनुभूती घेतली.ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व, व्यासपीठ चालक ह.भ.प सोनाजी महाराज बनकर यांनी केले.

या सप्ताहात एकूण १५ कीर्तने आणि ८ प्रवचने झाली.प्रत्येक वक्त्याने खूपच छान श्रवणीय अशी सेवा केली.या कार्यक्रमातील कीर्तनकार- ह . भ.प.पुष्पाताई महाराज जगताप,ह.भ.प.प्रज्ञाताई महाराज 'दानवे' ठोंबरे,ह.भ.प.शिवाजी महाराज कोकणे,ह.भ.प.सोनाजी महाराज बनकर ,ह.भ.प.नानासाहेब महाराज भोगाडे,ह.भ.प.विजय महाराज राजपुरे, ह.भ.प.किशोर महाराज भोराडे ह.भ.प.ज्ञानेश्वरीताई महाराज केरुळकर,ह.भ.प.प्रविण महाराज तरटे, ह.भ.प.माधुरीताई महाराज बनसोडे,ह. भ.प.सोनाजी महाराज तावरे,ह.भ.प.प्रदीप महाराज पवार,ह.भ.प.मंदाताई महाराज डोके,ह.भ.प.ज्ञानदेव महाराज जगताप, प्रवचनकार:- ह.भ.प.त्रिंबक महाराज गिरी,ह. भ.प.आबा महाराज सोले,ह. भ.प.गोवर्धन महाराज खाडे, ह.भ.प.सतीष दळवी सर, ह.भ.प.आदिनाथ औटे, ह .भ.प.ज्ञानदेव माऊली जगताप,ह.भ.प.संतोष बोरुडे सर, ह.भ.प.घनशाम खालासे सर आदींची सुंदर कीर्तन, प्रवचने श्रवण करायला मिळाली.हरिपाठ नेतृत्व - गंगाताई हजारे,आदीकताई लोखंडे,बिभीषण शिंदे यांनी केले. अन्नदाते- ह.भ.प अशोक डोके सर,श्री विजय आवारे, चिखली,श्री चंद्रकांत कानगुडे (मंगलमूर्ती किराणा) ह.भ.प आबा महाराज सोले,ह. भ.प किशोर महाराज भोराडे,ह.भ.प ज्ञानदेव माऊली जगताप,ह.भ.प काशिनाथ घोलप,ह.भ.प लहू तरटे पूर्ण सप्ताहात आठही दिवस पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ह.भ.प उमेश जगताप साहेब (तवलवाडी) यांची होती.दिनांक २२ मे रोजी ह भ प आदिनाथजी महाराज दानवे गुरुजी यांच्या सुश्राव्य अशा काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.या कार्यक्रमासाठी आष्टी आणि परीसरातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती,त्यामध्ये श्री सुम्बरे साहेब,ह.भ.प वांढरे बाप्पू,ह.भ.प तांदळे महाराज, सरपंच शालिनीताई मुळे, मा.सरपंच आदीकताई लोखंडे,ह. भ.प पांडुरंग गर्जे साहेब,ह.भ.प मंगेश देवा जोशी,पत्रकार अण्णासाहेब साबळे,रासकर दादा आदी मान्यवर उपस्थित होते.सुंदर मृदंग साथ अवधूत महाराज आवारे आणि अविनाश महाराज बनसोडे यांनी केली. चि। शुभम कोकणे यांनी भक्ती शक्ती ॄँ ीॅलिश चॅनेलवर हा कार्यक्रम श्रळींश केला त्याबद्दल धन्यवाद.ग्रंथदान श्री सतीश दळवी सर - ज्ञानेश्वरी ग्रंथ

वराट सर - विष्णू सहस्त्र नाम

तांदळे साहेब - समई

गंगाताई हजारे - १० टाळ

सरपंच मुळे ताई ;- ५० किलो साखर अक्षरा बनकर - भीतीवरील घड्याळ यांनी भेट वस्तू दिल्या यावेळी दानवे महाराज यांनी सर्वांना आशीर्वाद दिला.

# पाच दिवसांपासून खानवटे गावाची बत्ती गुल

## विजेचा लपंडाव थांबेना ; ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

ऐकीकडे उन्हाचा पारा वाढताच चालला असून दुसरीकडे खानवटे गावाची बत्ती गुल होतेय, उकाड्याने नागरिक बेचैन होत आहेत. खानवटे (ता.दौंड) गावचा गेली पाच दिवसांपासून वीजपुरवठा सलग खंडित होत असून,गावातील ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांच्या पाण्यासाठी अतिशय हाल चालू आहेत.

वादळी वारा,पाऊसाचे निमित्त होत असून दररोज बत्ती गुल होत आहे. तारा तुटणे,पोल पडणे,लाईन वरती झाडे पडणे ईत्यादी प्रकार सलग पाच दिवस झाले पुढे येत आहेत.

त्यामुळे खानवटे गावाची बत्ती गुल झाली आहे.ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांच्या पाण्यासाठी इतर ठिकाणी धडपड करावी लागत आहे. गेली पाच दिवसांपासून

वीजेचा खोळंबा सुरू आहे. वीजेचा लपंडाव हा थोडा ही वारा किंवा वादळ आल्यावर वीज जाते. माञ, त्यानंतर तासंतास वीज पुरवठा खंडीत राहतो.याचा सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार वीज गेल्याने त्याचा सर्वसामान्य नागरीकांसह व्यापारी वर्गाला मोठा फटाका बसला आहे. या सर्व प्रकारामुळे चोरीचे प्रमाण देखील वाढले आहे.याठिकाणी नागरिक त्रस्त झाले असून महावितरणच्या विरोधात नाराजी पाहायला मिळत आहे.

यावर ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे, अन्यथा मोठे जन आंदोलन करण्यात येईल असे भाजपा तालुका मुख्य समितीचे सदस्य शरदराव ढवळे यांनी सांगितले.



### हरवलेली पाखरे वीस वर्षानंतर पुन्हा एकत्र

# इयत्ता बारावीच्या माजी विद्यार्थि- विद्यार्थ्यांनी भरवला स्नेहसंमेलन मेळावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**





यवत दिनांक २३, विद्या विकास मंदिर यवत तालुका दौंड जिल्हा पुणे या विद्यालयाच्या२००३ व २००४ च्या बॅचने वार्षिक स्नेहसंमेलनाचा मेळावा रविवार दिनांक १९ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला.या मेळाव्याचे मोठे वैशिष्ट्य असे होते की तब्बल विस वर्षानंतर सर्व माजी विद्यार्थी - विद्यार्थिनी पुन्हा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एकत्र येत तब्बल विस वर्षानंतर गेल्या दोन महिन्यापासून या स्नेहसंमेलन मेळाव्याचे नियोजन ठरले होते. या संमेलनाला यशस्वी करण्यासाठी पांडव ग्रुप चे विद्यार्थी दिनेश पाटणे नवनाथ यादव गणेश जराड सचिन लाटकर संतोष राजगुरू बापू शेळके गहिनीनाथ पवार धवल गांधी यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. सर्व माजी विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर, वर्गातील जुनी पटसंख्या व त्यांचे पत्ते काढून या स्नेहसंमेलनाच्या मेळाव्याचे सर्वांना कळवले.

तब्बल २७ विद्यार्थी व २७ विद्यार्थिनी यांनी रविवार दिनांक १९ मे रोजी यवत येथील श्रेयस हॉटेल येथे सकाळी नऊ वाजता एकत्र आले. त्यानंतर दिवसभर यवत येथील मेहर रिसॉर्ट येथे संगीत खुर्ची डान्स विद्यार्थ्यांचे मनोगत,गिफ्ट, उखाणे असे विविध मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले.जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच संध्याकाळी ५ नंतर विद्या विकास मंदिर या शाळेच्या वर्गामध्ये सर्व आजी-माजी शिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा सत्कार व सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा सोहळा पाहून शिक्षकही भारावून गेले त्यांच्याही आनंदाला पारा उरला नव्हता. यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी विद्यार्थिनी तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्ष सारिकाताई भुजबळ यांनी आपले विद्या विकास मंदिर बद्दल बोलताना आपले यवत गाव एक सुसज्ज असे गाव आहे, जेथे हाकेच्या अंतरावरती रेल्वे स्टेशन गावाला लागूनच नॅशनल हायवे,भुलेश्वर देवस्थान सारखे निसर्गरम्य ठिकाण,भांडगाव माणकोबाची वाडी,बोरियेंदी येथील एमआयडीसी उपयुक्त सुसज्ज असे माळरान,यवत गावामध्येच असणारे दोन कालवे यवतमधील पंचक्रोशीतील मोठी बाजारपेठ पूर्ण दौंड तालुक्यात लोकसंख्येत सुद्धा मोठे असलेले आपले गाव मग तरीही आपल्या गावातील युवा पिढी ही शिक्षणासाठी बाहेर का? रोजगारासाठी बाहेर का ? येथील शेतकरी सुद्धा शेतीमाल विकण्यासाठी बाहेर का ? पर्यटनाच्या बाबतीत भुलेश्वर सारखे निसर्गरम्य ठिकाण आपल्या गावालगत असतानाही पिकनिक किंवा ट्रिप साठी आम्ही जातोय ते बाहेरच असे का ? आता यवतसह पंचक्रोशीचा विकास करण्यासाठी भविष्यात नक्कीच आपण सर्व आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन यवत गावासह पंच क्रोशीचा कायापालट करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे,आपल्या यवत व पंचक्रोशीतील गावांमध्ये सीनियर कॉलेज नाही, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे आयटीआय नाही, म्हणायला सरकारी दवाखाना आहे परंतु उपचार येथील पंच क्रोशितील स्थानिकांना खाजगी दवाखान्यातच घ्यावा लागतो असे का ? सीनियर कॉलेज,मोठी बाजारपेठ,मोठी एमआयडीसी, सुसज्ज असा सरकारी दवाखाना अशा सुख-सुविधा करण्यासाठी भविष्यात नक्कीच मी पुढाकार घेणार असे मनोगत व्यक्त करताना सारिका भुजबळ यांनी सांगितले.यावेळी स्नेहसंमेलन मेळाव्यात जे माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यशस्वीरित्या वाटचाल करत आहे, त्यांचाही सन्मान या कार्यक्रमात झाला.विद्यार्थिनींमध्ये स्वाती माळवतकर, कीर्ती गरुड,वर्षा लकडे,सुप्रिया कुदळे,रोहिणी दोरगे, सारिका भुजबळ,पुनम चिंचकर शितल बडेकर,पद्मा ढोकले,ज्योती तनपुरे,स्नेहल आल्हाट,कविता दोरगे, वैशाली दोरगे,राणी दोरगे आणि दिनेश पाटणे, संतोष राजगुरू,नवनाथ यादव,महेश पाटील, गहिनीनाथ पवार,बापू शेळके,अण्णासाहेब दोरगे, राकेश शेलार,धवल गांधी सचिन लाटकर तसेच शिक्षक वर्ग कुदळे मॅडम,मासाळसर,सावंतसर,जीटे सर,पोमनसर,बापू तेलंग कोळी शिपाई बापू शिपाई अशा सर्वांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. तसेच दिवंगत बचावसर,संकपाळमॅडम,पवार सर, माजी शिपाई मच्छिंद्र काळे यांनाही श्रद्धांजली आजी-माजी विद्यार्थी - विद्यार्थिनी आणि शिक्षकांकडून वाहण्यात आली.आणि कार्यक्रमाची सांगता करण्याची वेळ आली तेव्हा सर्वांनाच अश्रू दाटून आल्याचे पाहायला मिळाले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904